


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३५४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०४ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# जुलैमध्ये पावसाचा दिलासा, पण ऑगस्टमध्ये काय होणार? हवामान विभागाचा ताजा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** ‘एल निनो’च्या काळात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या प्रणालींनी यंदा राज्याला, तसेच धरणक्षेत्रालाही दिलासा दिला आहे. जूनमध्ये राज्याच्या अनेक भागांत मान्सूनने निराशा केल्यानंतर जुलै महिन्यात मात्र पावसाने जोरदार पुनरागमन केले. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, १ ते ३१ जुलै या कालावधीत राज्यात सरासरीच्या तुलनेत ४० टक्के अधिक पावसाची नोंद झाली. राज्यात सरासरी ३२४.२ मिलीमीटर पावसाऐवजी ४५४.२ मिलीमीटर पाऊस झाला.

**गोव्यामध्ये अजूनही पावसाची तूट**

बंगालच्या उपसागरातील प्रणालींचा फायदा मध्य महाराष्ट्राला सर्वाधिक झाला असून मध्य महाराष्ट्रात ७२ टक्के अतिरिक्त पाऊस झाला. कोकण-गोवा विभागात ३३ टक्के अधिक पाऊस नोंदला गेला. गोव्यामध्ये अजूनही पावसाची तूट असल्याने या तुटीचा परिणाम कोकण-गोवा विभागाच्या आकडेवारीवर झाला आहे अन्यथा कोकण विभागामध्ये सिंधुदुर्ग वगळता इतर जिल्ह्यांना दिलासा मिळाला आहे. यामध्ये मुंबई शहर आणि उपनगरांसह, पालघर जिल्ह्याचाही समावेश होतो. पालघरमध्ये सरासरीपेक्षा ६१ टक्के अतिरिक्त पाऊस नोंदला गेला आहे. विदर्भात २१ टक्के, तर मराठवाड्यात



१७ टक्के अतिरिक्त पावसाची नोंद झाली. त्यामुळे राज्यातील चारही विभागांमध्ये जुलै महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे दिसत आहे.

**कुठे किती पाऊस?**

राज्यात नाशिक जिल्ह्याला जुलैच्या पावसाने फायदा झाला. नाशिक जिल्ह्यात सरासरी २९४.५ मिलीमीटर पावसाच्या तुलनेत ७९०.८ मिलीमीटर पाऊस झाला. तो १६९ टक्के अधिक आहे. त्यापाठोपाठ पुणे जिल्ह्यात १२९ टक्के, पालघरमध्ये १२४ टक्के अतिरिक्त पावसाची नोंद झाली. मुंबई उपनगरात ७४ टक्के, मुंबई शहरात ६० टक्के, रायगडमध्ये ५७ टक्के, ठाणे जिल्ह्यात ५३ टक्के, धुळे जिल्ह्यामध्ये ५३ टक्के, जळगावमध्ये ४९ टक्के आणि अहिल्यानगरमध्ये ४८ टक्के अधिक पाऊस झाला. यामुळे धरण क्षेत्रालाही फायदा झाल्याचे दिसते.

**६ ते १३ ऑगस्टपर्यंत कमी पर्जन्यमान?**

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पाऊस झाला असला, तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यात उणे २७ टक्के, नंदुरबार जिल्ह्यात उणे २३ टक्के पाऊस नोंदला गेल्याने या दोन जिल्ह्यांमध्ये पावसाची लक्षणीय तूट कायम राहिली. यासोबतच सोलापूर १७ टक्के, बीड सहा टक्के आणि हिंगोलीमध्ये ५ टक्के तूट नोंदली गेली. सहा ऑगस्टपर्यंतच्या कालावधीत पश्चिम विदर्भ, मराठवाड्याचा काही भाग, तसेच उत्तर मध्य महाराष्ट्राचा काही भाग येथे पावसाचे सातत्य राहू शकते. त्यामुळे पावसाची ही स्थिती आणखी सुधारेल, अशी शक्यता आहे. सहा ते १३ ऑगस्ट या काळात मात्र कोकण, विदर्भ येथे सरासरीहून कमी पाऊसमानाची शक्यता आहे

# हिंदुत्ववादी सरकारने वृद्ध वारकरी कलावंतांना दिलासा द्यावा

## अन्यथा वारकरी संघटनांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन उभारू : धर्मभूषण शास्त्री महाराज

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नांदुरा (बुलडाणा) :** हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रातील वृद्ध कलावंत आणि वारकऱ्यांची होणारी हेडसांड त्वरित थांबवावी. प्रत्येक जिल्ह्यात मानधन समितीची स्थापना करुन वृद्ध कलावंत वारकऱ्यांना दिलासा आधार देण्याचे कार्य त्वरित सुरू करावे. वारकरी धर्म परिषदेच्या वतीने लोकशाही मार्गाने वारंवार सदर मागणी शासन प्रशासन दरबारी करण्यात आली. परंतु अद्याप नव वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही सदर समित्या कार्यान्वित करण्यात आल्या नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित समित्यांची स्थापना करावी अन्यथा वारकरी धर्म परिषदेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा वासुदेव महाराज शास्त्री यांनी दिला आहे.वारकरी धर्म परिषद बुलढाणा जिल्हा द्वारा नांदुरा खुर्द येथे दोन ऑगस्टला एक दिवसीय वारकरी संवाद मेळाव्याचे आयोजन विठ्ठल रुक्मिणी संस्थान मध्ये करण्यात आले होते. यावेळी समारोपीय सत्रात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष वारकरी धर्मभूषण वासुदेव महाराज शास्त्री यांनी उपरोक्त मत व्यक्त करीत आक्रमक पवित्रा घेतला आहे.

वारकरी धर्म परिषदेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष विलास महाराज वाघमारे यांच्या अध्यक्षतेत तर राष्ट्रीय महासचिव हभप प्रबोधनकार सतीशचंद्र रोठे पाटील, हभप रामभाऊ महाराज झांबरे,जिल्हाध्यक्ष प्रकाश महाराज घोंगटे, जिल्हा सचिव नंदकिशोर निमकर्डे, शेख यूनूस सर्वश्री हभप मनोहर कोल्हे, गजानन पाटील,सौ मंदाताई सोनटक्के,नंदाबाई सोनोने, सुनंदा घाडगे, उमाळेताई, सौ.गंगाताई आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये समारोपीय सत्रात संवाद परिषदेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी समोयोचीत मनोगत व्यक्त करीत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे बहारदार संचालन नंदकिशोर निमकर्डे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष प्रकाश महाराज घोंगटे यांनी व्यक्त केले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी वारकरी धर्म परिषद आणि विविध भजनी मंडळांनी अथक परिश्रम घेतले.



**वारकरी संवाद परिषदेत ठराव पारीत....**

**वारकरी धर्म परिषद राज्यव्यापी आंदोलन उभारनार.**

सद्यस्थितीत महाराष्ट्रात मागील आठ ते दहा वर्षापासून कलावंत मानधन समितीची स्थापना करण्यात आली नाही त्यामुळे असंख्य वृद्ध कलावंत कीर्तनकार प्रवचनकार आदींना सदर योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच जगाचा निरोप घेण्याची वेळ आली आहे. सरकारच्या आर्थिक नियोजनात वृद्ध कलावंत कीर्तनकार प्रवचनकारांना कोणतेही सन्मानाचे स्थान नाही का..? असा सवाल उपस्थित करत येणाऱ्या काळात महाराष्ट्रातून वारकरी धर्म परिषदेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात वृद्ध कलावंत मानधन समितीची स्थापना करण्यासाठी आंदोलन उभारण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**योग माया मुक्ताबाई गजराने दुमदुमली नांदुरा नगरी..**

वारकरी संवाद परिषदेच्या प्रारंभी नांदुरा आणि नांदुरा खुर्द गावातून आदिशक्ती मुक्ताई चा गजर करीत ग्राम प्रदक्षिणा करण्यात आली. त्यानंतर विठ्ठल रुक्मिणीची महापूजा करीत वारकरी धर्म परिषदेच्या संवाद परिषदेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी वारकरी धर्म परिषद महाराष्ट्र संलग्नित असलेल्या जय गजानन भजनी मंडळ, माऊली भजनी मंडळ, जंगली भजनी मंडळ,गजानन बाबा भजनी मंडळ, मुक्ताई भजनी मंडळ, नूतन शारदा मंडळ, आदिशक्ती भजनी मंडळ यासह वारकरी धर्म परिषदेच्या महिला पदाधिकारी यांनी ग्रामप्रदर्शना आणि संवाद परिषदेचा उपस्थित राहून बहुसंख्येने सहभाग नोंदविला.

**जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीकांत आळशी यांची निवड**

सामाजिक तथा धार्मिक कार्यात सदैव कार्यतत्पर राहणारे श्रीकांत हरिहर आळशी यांची जिल्हा उपाध्यक्षपदी तर श्रीकृष्ण सातव, कृष्णा भोपळे, रमेश राखोंडे, गजानन सोनवणे, अर्जुन राखोंडे, आदींची वारकरी धर्म परिषदेच्या जिल्हा कार्यकारणी सर्वानुमते निवड करण्यात आली.

# मिरा-भाईंदरच्या मुख्य रस्त्यांवरील खड्ड्यांप्रश्नी राजू भोईर यांची पोलिसांकडे तक्रार



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे महापालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी वेळेत लक्ष दिले नाही, असा आरोप करत शिवसेना जिल्हाध्यक्ष राजू भोईर यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाकडे लेखी तक्रार केली आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांची योग्य देखभाल न झाल्यामुळे रस्त्यांवर खड्डे निर्माण झाले असून, वाहनचालक, पादचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्यांची वेळोवेळी पाहणी करून खड्डे पडू नयेत तसेच रस्त्यांची योग्य देखभाल व्हावी यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप राजू भोईर यांनी केला आहे.

त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून संबंधित महापालिका अधिकारी व जबाबदार व्यक्तींविरुद्ध नियमानुसार तक्रार नोंदवून आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

दरम्यान, रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना सुरक्षित व खड्डेमुक्त रस्ते उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नाने विधवेला न्याय !

## भनगडेवाडीतील महिला कामगाराला मिळवून दिले २.१० लाखांचे अनुदान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील भनगडेवाडी येथील विधवा बांधकाम कामगार श्रीम. सुनीता अंबादास अडसूळ यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान मंजूर करून देण्यात आमदार काशिनाथ दाते यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे यश आले आहे.

सुनीता अडसूळ यांचे पती अंबादास अडसूळ यांचे बांधकाम करताना दुःखद निधन झाले. त्यानंतर कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या सुनीता ताईंनी अंत्यविधी सहाय्य आणि मृत्यूनंतरच्या अनुदानासाठी अर्ज केला होता.

मात्र हा लाभ मंजूर करण्यासाठी मध्यस्थांकडून ५५ हजार रुपयांची मागणी होत असल्याचे पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षा सौ. जयश्री शिंदे यांना समजले. त्यांनी ही बाब त्वरित आमदार काशिनाथ दाते यांच्या निदर्शनास आणून दिली.



प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार दाते यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. शासनाच्या योजनेचा लाभ कोणत्याही आर्थिक मागणीशिवाय पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

त्यांच्या पाठपुराव्यानंतर अंत्यविधीसाठी १०,००० रुपये आणि मृत्यू अनुदान २,००,००० रुपये असे एकूण २,१०,०० रुपये सुनीता अडसूळ यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले. घर नसलेल्या सुनीता ताईंसाठी हा निधी मोठा आधार ठरला आहे.

● सुनीता अडसूळ म्हणाल्या, पतीच्या निधनानंतर मी हतबल झाले होते. दाते सर आणि जयश्री ताईंनी मदत केल्यामुळे आज मला हक्काचे पैसे मिळाले.

**जयश्री शिंदे म्हणाल्या...**

● गरीब नागरिकाला योजनेचा लाभ मिळवण्यासाठी पैसे मागितले जाऊ नयेत. सामान्य माणसाला न्याय देणे हीच आमची जबाबदारी आहे. शासनाच्या योजना प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी घेतलेली ही भूमिका परिसरात आश्वासक ठरली आहे.

# शोरुम लॉकर चोरीचा एलसीबीकडून अवघ्या काही तासातच उलगडा ! आरोपी अटकेत




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** शहरातील रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शोरूममधील गोदरेज लॉकर फोडून चोरी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अवघ्या काही तासांत अटक करत गुन्ह्याचा यशस्वी छडा लावला आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत आरोपीकडून रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ₹२०,५७,१४० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी रामनगर पोलीस ठाण्यात शोरूममधील गोदरेज लॉकर उघडून चोरी झाल्याची तक्रार दाखल झाली होती. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेने हाती घेत तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी प्रथम प्रभाकर दडमल (वय २४),रा. उमरेड, जि.नागपूर, यास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपीकडून ₹५७,१४० रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा हॅरियर वाहन (किंमत अंदाजे ₹ २० लाख) जप्त करण्यात आले. अशाप्रकारे एकूण ₹२०,५७,१४० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पुढील तपासासाठी आरोपीला रामनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या देखरेखीखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात उपविभाग चंद्रपूर शहर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.




## चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निमर्ता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# दानाची चोरी आणि चोरीचे 'राजकारण'



कोणीही कल्पना केली नसेल अशा पद्धतीने राम मंदिर दान चोरी प्रकरण बाहेर आले, ज्यांच्यावर विश्वास ठेवला, तेच ट्रस्टी आणि त्यांचे चेलेचपाटे यांनी या दानावर करोडो रुपयांचा डल्ला मारला, आणि प्रभु रामचंद्रांच्या साक्षीने महापाप केले, यामुळे मात्र करोडो राम भक्तांच्या श्रद्धेला तडा गेला आहे. राम जन्मभूमी अयोध्येत राम मंदिर व्हावे यासाठी प्रदीर्घ न्यायालयीन लढा दिला, अनेक वर्षे देशाचे राजकारण, समाजकारण या भोवतीच फिरत होते, अनेक राजकीय पक्ष, धार्मिक संघटना यासाठी लढल्या, लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा काढली, अख्खा देश ढवळून निघाला, आस्था, श्रद्धा या बरोबरच राम मंदिराचा मुद्दा राजकिय बनवला गेला, यामुळेच भाजपला सत्तेचे अच्छेदिन पहायला मिळाले आणि याच भाजपच्या कार्यकाळात राम मंदिर दान चोरी प्रकरण घडले हे अधिक दुर्दैवी आहे.

राम मंदिरासाठी जमीन अधिग्रहण, खरेदी पासुन राम मंदिर ऊभारणी, प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार झाल्याचे आता ऊघड होत आहे, अगदी अल्पावधीतच अतिशय अनाकलनीय पद्धतीने अयोध्येतील जमीनीचे भाव वाढले, ट्रस्ट ने अव्वाच्या सव्वा रक्कम देऊन जमीन खरेदी केली, बांधकाम चाळी टक्के कमिशनची बाब ऊघड झाली हे सगळे पहाता भ्रष्टाचार किती झाला असावा याचा अंदाज येतो. विशेष म्हणजे डबल, ट्रिपल इंजिन असुनही भ्रष्टाचार झाला आणि हे ऊघड झाल्यानंतर एसआयटी च्या निमित्ताने खऱ्या गुन्हेगारांना वाचविण्याचाच प्रयत्न चालला आहे कारण घोटाळा करणारे हे एकाच माळेचे मणी आहेत. घोटाळा उघडकीस येण्याच्या पाठिमागे काहिसे राजकारण असावे आणि बाहेर आल्यावर तर आरोप प्रत्यारोप, राजकारण जोमाने सुरू आहेत. विरोधकांनी हा प्रश्न चांगलाच लावून धरला आहे, गेल्या आठवड्यात अपक्ष खासदार पप्पु यादव यांनी भगवे वस्त्र घालुन संसदेच्या परिसरात ठाण मंडून भोंदूगिरीचे नाट्य सादरीकरण केले याला विरोधकांची साथ मिळाली, आता पप्पु यादव, राहुल गांधी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे असाच गुन्हा अन्य ठिकाणी देखील दाखल करण्यात आला आहे हा सगळा राजकारणाचाच भाग आहे.

दिल्लित दान चोरीचे राजकारण जोमात असतांना राज्यात देखील मुंबई मधील सुप्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात कोट्यावधी रुपयांची लुट झाल्याचे आरोप होऊ लागले आहेत आणि या संदर्भात विश्वस्तांनीच ऊप मुख्यमंत्री ऐकनाथ शिंदे यांना पत्र लिहिल्याचे दावे केले जात आहे तर देवस्थानात काही गैरव्यवहार झाला नाही असे सिद्दिविनायक न्यासचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी स्पष्ट करतांना भाविकांकडून दर्शन घेण्यासाठी भाविकांकडून पैसे घेण्यात गैरव्यवहार झाला त्यामुळे नऊ कर्मचाऱ्यांना बडतर्फ केल्याचे सांगितले आहे याचाच अर्थ काहीतरी गैरव्यवहार होत आहे हे नक्की. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील याबाबत आरोप केले आहेत.या अगोदर तिरूपती देवस्थानातील लाडु प्रकरण, शिर्डी देवस्थानांमधील गैरव्यवहार तसेच केदारनाथ देवस्थानातील चोरी प्रकरण याची चर्चा रंगली होती. त्याच बरोबर आता बाळुमामा मंदिरात ६० कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला आहे.

मोठ्या श्रद्धेने भक्तिभावाने भाविक, श्रद्धाळु देवदर्शनाला येत असतात, आपापल्या कुवतीनुसार, श्रद्धेनुसार दानधर्म करत असतात तो चांगला हेतु मनात ठेवून पण केलेले दान सत्पात्री लागत नसेल तर भाविकांच्या श्रद्धेला तडा जातो, देवावरील विश्वास ऊडु लागतो. मोठ्या विश्वासाने ट्रस्ट बनवला गेला त्याच्या कडुनच जर अशाप्रकारे विश्वासघात होणार असेल तर विश्वास ठेवायचा तरी कोणावर? आज अगदी गल्लीतील गणेशोत्सव, नवरात्र ऊत्सव वा ईतर धार्मिक सण उत्सव साजरे करतांना असेच प्रकार कमी अधिक प्रमाणात होतात. स्वेच्छेने दिल्या जाणाऱ्या वर्गणीला आता सक्तीच्या खंडणीचे स्वरूप आले आहे हे कटु वास्तव आहे.

देवाच्या नावाने होणारी अशी लुट अतिशय दुर्दैवी आहे. धार्मिक स्थळे ही जणु श्रद्धेचा बाजार मांडलेली लुटीची कुरणे बनली आहे. मात्र या निमित्ताने देवावरील विश्वास ठेवायचा तरी कसा? असा प्रश्न पडतो. देवस्थानात अशा प्रकारे गैरप्रकार होत असतील तर भाविकांच्या श्रद्धेला तडा जातो आणि देवाच्या दारी दानाची चोरी या सारखे दुसरे महापाप नाही. वारंवार असे प्रकार ऊघड होणे यामुळे भाविकांचा देवावरील विश्वास ऊडु लागतो हे अतिशय दुर्दैवी आहे. पाप पुण्याच्या कल्पनांनाच यामुळे तडा जात आहे. ऐकूणच देवस्थाने लुटीची' कुरणे 'बनली आहेत का? ऐकुणच देवाच्या दारी दानाची चोरी आणि चोरीचे राजकारण देशात आणि राज्यात जोमाने सुरू आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# वेगळ्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बसवणे चुकीचे !

गणेशोत्सव हा तसा मुंबई ठाण्यासह कोकणात उत्साहाने साजरी केला जाणारा उत्सव. गेल्या काही वर्षांत मात्र तो राज्याच्या अन्य भागांसह देशात आणि विदेशात ज्या ज्याठिकाणी मराठी बांधव राहतात तिथे जल्लोषात साजरा होऊ लागला आहे. गणेशोत्सवाला जसे व्यापक स्वरूप प्राप्त होऊ लागले तशा काही चुकीच्या गोष्टींनीही या उत्सवात शिरकाव केला. श्री गणेशाचे रूप कसे आहे याचे यथोचित वर्णन श्री गणपती अथर्वशीर्षात आहे. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बसवण्यात येणाऱ्या गणेशमूर्तीही तशाच असायला हव्यात; मात्र प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही. हल्ली बहुतांश सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये श्री गणेशाच्या मूर्तीपेक्षा सजावटीला अधिक प्राधान्य दिले जात असल्याने त्यानुरूप विविध वेशभूषेतील मूर्त्या आणल्या जातात. मुंबईतील काही मंडळांत भव्य गणेशमूर्ती हेच गणेशभक्तांचे आकर्षण केंद्र असल्याने काहीतरी वेगळे करायचे म्हणून दरवर्षी वेगवेगळ्या स्वरूपात आणि अन्य देवतांच्या, अवतारांच्या वेशभूषेत गणेशमूर्ती साकारल्या जातात. गणेशमूर्ती बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये फेरफटका मारला असता यंदाही अनेक गणेशोत्सव मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराज, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, भगवान श्री शंकर, श्रीविष्णू, स्वामी समर्थ, साईबाबा आदींच्या वेशभूषेत गणपतीच्या मूर्ती बनवण्यासाठी ऑर्डर्स दिल्या आहेत. सर्व देवता आणि अवतार हे भक्तांचे कल्याण आणि दृष्ट प्रवृत्तीचा संहार करणाऱ्याच असल्या तरी प्रत्येक देवतेचे कार्य वेगवेगळे आहे, तसे त्यांचे उत्सवही वेगवेगळे आहेत, कृष्णजन्माष्टमीला आपण श्री गणेशाची मूर्ती घरी आणत नाही किंवा श्री रामनवमीला श्री गणेशाची शोभायात्रा काढत नाही मग श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशाला विविध वेषभूषांत का दाखवतो ? हिंदू धर्मातील प्रत्येक देवतेला विशिष्ट आकार आणि विशिष्ट वेशभूषा आहेत. त्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमेतून अथवा मूर्तीतून त्या त्या देवतेचे तत्व आणि चैतन्य प्रक्षेपित होते असे धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे मूर्तीला श्रीरामाच्या मूर्तीचा आकार दिला आणि शीर केवळ श्रीगणेशाचे लावले कि ती मूर्ती शत प्रतिशत श्रीगणेशाची होत नाही. कारण शरीराचे अन्य अवयव आणि वेशभूषा ही श्रीरामाचीच असणार आहे. त्यामुळे श्रीगणेशमूर्तीवर असे प्रयोग करणे योग्य नाही. स्वामी समर्थांचे काही भक्त घरी स्वामींच्या वेशभूषेतील गणपती आणतात. साईबाबांचे भक्त साईबाबांच्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बनवून घेतात तर छत्रपती शिवरायांचे कट्टर शिवभक्त चक्क छत्रपती शिवरायांच्या वेशातील गणेशमूर्ती ऑर्डर करून बनवून घेतात. अशा प्रकारच्या गणेशमूर्ती गणेशचतुर्थीच्या दिनी घरी आणणाऱ्याचा त्या त्या संतांविषयी आणि महापुरुषांविषयी श्रद्धेचा भाग असला तरी अशा प्रकारे आपल्या प्रतिमेला विघ्नहर्त्या श्रीगणेशाच्या स्वरूपात दाखवणे स्वामींना



किंवा छत्रपती शिवरायांना कधीतरी आवडले असते का, याचा विचार ही मंडळी का करत नाहीत.

घरातील बच्चे कंपनीवर कार्टून विश्वातील पात्र, सुपरमॅन, बॅटमॅन यांसारख्या व्यक्तीरेखा यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे त्यांना खुश करण्यासाठी या पात्रांच्या रूपात गणेशमूर्ती साकारण्याच्या ऑर्डर्स पालकांकडून दिल्या जातात. अशा काल्पनिक पात्रांच्या वेशात श्रीगणेशाला साकारणे हा श्रीगणेशाचा अवमान नव्हे का ? गणेश चतुर्थीच्या दिवशी घरी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींच्या माध्यमातून साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी अवतरणार आहेत. जोपर्यंत ते आपल्या घरी विराजमान आहेत तोपर्यंत त्यांची आपल्याला मनोभावे सेवा करायची आहे हा भाव २४ तास जागृत राहण्यासाठी श्रीगणेशमूर्तीही शास्त्रात सांगितल्याप्रमाणे चौरंगावर किंवा आसनावर विराजमान असलेली हवी. वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या स्वरूपातील श्रीगणेशाला १० दिवस पुजून अनंत चतुर्दशीला या पुजलेल्या मूर्तीचे जेव्हा आपण विसर्जन करतो. तेव्हा हे विसर्जन नेमके श्री गणेशाच्या मूर्तीचे होते कि अन्य देवता, संत आणि महापुरुष यांच्या मूर्तींचे ? याचा विचार अशा मुर्त्या घरी आणणाऱ्यांनी करायला हवा. काही मंडळांमध्ये किंवा घरच्या सजावटींमध्ये श्री गणेशमूर्तीला चलचित्राच्या स्वरूपात दाखवले जाते, काही ठिकाणी पेटित पैसे टाकल्यावर श्रीगणेशमूर्ती उभी राहून पैसे टाकणाऱ्याला लाडूचा प्रसाद देतानाचे प्रयोजन केलेले असते. विविध धातूंच्या भांड्यांपासून, फळांपासून, सुक्यामेव्यापासून, चॉकलेटपासून गणेशमूर्त्या बनवल्या जातात.

हासुद्धा श्रीगणेशाचा अवमानच आहे. गणेशोत्सवाच्या दरम्यान काही कंपन्या व्यावसायीक हेतूने श्रीगणेशाचा वापर आपल्या जाहिरातींमध्ये करतात. अशांवर गणेशाची कृपा होईल का ? आपल्याला पुरेसे धर्मशास्त्र ज्ञात नसल्याने धार्मिक सणांच्या आणि उत्सवांच्या बाबतीत 'मला सर्व कळते' या विचाराने आपण हवे तसे वागतो, हवे तसे करतो. धार्मिक सण शास्त्रीय दृष्ट्या कसे साजरे करावेत याबाबतचे सविस्तर लिखाण आपल्या ऋषीमुनींनी प्राचीन धर्मग्रंथांत हजारो वर्षांपूर्वीच मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्याने मनुष्याला उचित लाभ होतो आणि आनंदही मिळतो. याउलट आपण आपल्याच मनाप्रमाणे कारण्याचा प्रयत्न केल्यास लाभ तर होणार नाही उलट हानीच होण्याचा अधिक संभव असतो.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## नोटा फोटो

नोटेवरला तोफोटो
का मनांत सलतो
वारावाहतोयं तसा
असा कसा झुलतो

काहीतरी सांगतोयं
मुक पणाने बोलतो
दे बापुजींची स्मृती
चित्रपट तो हलतो

बदलायं हवा फोटो
विवाददारे खोलतो
महापुरुषांना उगाचं
एक तराजू तोलतो

सारेचं जरी वंदनीय
कसले मोल लावतो
फुट पाडून एकीमधे
कसा आनंद घावतो

नोट ना फक्त कागद
खरी संस्कृती दर्शतो
रे नोटांचा स्पर्श तो
थेट हृदयास स्पर्शतो

क्रेडिट डेबिट कार्डा
रे आनंद कुठला तो
गांधीजी दर्शन न हो
फक्त व्यापारी होतो

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक ... बातमी

# अलं निनोचा अंदाज फोल ठरला...

यंदा मोसमी पावसाने हवामान विभागासह सर्वानाचं चकवा देऊन अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. त्यामुळे यावर्षी पाऊस कमी होणारं या अल निनोच्या दाव्याला खोटे ठरविले आहे मुंबईत जून पासून आतापर्यंत सरासरीच्या ८३ टक्के पाऊस बरसला आहे. देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील राज्यांमध्ये पावसाने जुलै अखेरीस तडाखा दिला असून अनेक भागांमध्ये पुराची स्थिती असल्याचे समोर आले आहे. केरळमध्ये पावसाने आठ बळी घेतले आहेत.

तर ईशान्येला असाममध्येहि पुराने थैमान घातले असून आतापर्यंत ब्याऐंशी जणांचा बळी गेला आहे. केरळमध्ये दरड कोसळून, पूर येऊन मोठया प्रमाणात नुकसान झाले असून गुजरातेत अनेक महामार्ग जलमय झाल्याने काही भागातील रस्ते बंद ठेवावे लागले आहेत. जुलै अखेरीस पावसाने चांगलीच ब्याटिंग करुन धुव्वा उडवून दिला आहे. देशातील विविध भागांमध्ये कोसळणाऱ्या पावसाने काही धरणे शंभर टक्के तर काही भरण्याच्या मार्गांवर आहेत त्यामुळे अलं निनोचा अथवा हवामान



विभागाचा अंदाज फोल ठरला असल्याचे दिसून येते आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# धोकादायक इमारतीविरुद्ध महानगरपालिकेची तोडक कारवाई ‘सागर दर्शन’ इमारतीच्या तोडक कारवाईस सुरुवात



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा–भाईंदर :** दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ रोजी मिरा–भाईंदर महानगरपालिका आयुक्त मा. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत प्रभाग समिती क्रमांक ०१ अंतर्गत उत्तन नाका येथील ‘सागर दर्शन’ या धोकादायक घोषित इमारतीवर तोडक कारवाईस प्रारंभ करण्यात आला. शहरातील धोकादायक इमारतींमुळे नागरिकांच्या जीवित व वित्तहानीचा धोका निर्माण होऊ नये, तसेच सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने महानगरपालिका प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात येत आहे.

मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या आदेशानुसार व उपायुक्त (अतिक्रमण) स्वप्नील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागांनी नियोजनपूर्वक तोडक कारवाई सुरू केली. कारवाईदरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना राबविण्यात आल्या असून परिसरात नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत वाहतूक, मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीचे योग्य नियोजन करण्यात आले.

महानगरपालिका प्रशासनाकडून धोकादायक इमारतींची नियमित पाहणी करण्यात येत असून, तज्ज्ञांच्या अहवालानुसार अत्यंत धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींवर टप्प्याटप्प्याने कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा इमारतींमधील रहिवाशांनी महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) स्वप्नील सावंत, अतिक्रमण विभागप्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग समिती क्रमांक ०१ सहाय्यक आयुक्त दिपाली पवार तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


# खारघरच्या पाणीटंचाई वरून सिडकोला नागरिकांचा घेराव



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.०३, खारघर (नवी मुंबई) :** राज्यभर मुसळधार पाऊस सुरू असतानाही खारघर परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी भाजपाचे नगरसेवक समीर कदम आणि उषा अडसुळे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी सिडकोच्या रायगड भवन कार्यालयावर धडक मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. जवळपास तीन तास सुरू असलेल्या या आंदोलनामुळे सिडको कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनादरम्यान नागरिकांनी सिडको प्रशासना विरोधात तीव्र घोषणाबाजी करत अधिकाऱ्यांना विविध प्रश्नावर ज्या विचारला आंदोलन करतांनी खारघरमध्ये नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्यभर पावसाने जोर धरला असतानाही रखारघरकरांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे संगत सिडकोच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले विशेष म्हणजे पाणीटंचाई मागे टँकर लॉबीला जास्त प्रधान्य दिले जात असल्याचा गंभीर आरोपही नागरिकांनी केला. नद्वारे नियमित पाणीपुरवठा करण्याऐवजी टँकर व्यवस्थेला चालना दिली जात असल्याने नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे यावेळी नगरसेवक समीर कदम यांनी सांगितले दर सोमवारी केली जाणारी पाणी कपात बंद करून पाणी सोडण्याची वेळ निश्चित करावी हा विषय आंदोलनाकानांचा प्रमुख मुद्दा ठरला. आंदोलनाच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलवले त्यानंतर सुमारे दोन तास सिडकोचे अधिकारी नगरसेवक समीर कदम व नगरसेविका उषा अडसुळे आणि सोसायटी यांच्या प्रतिनिधीमध्ये सविस्तर बैठक पार पडली. बैठकीत पाणी पुरवठ्याशी संबंधित विविध प्रश्न नागरिकांच्या तक्रारी आणि उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात आली चर्चेनंतर सिडको प्रशासनाने नागरिकांच्या मागणीची दखल घेत दहा ते पंधरा दिवसांची मुदत मागितली या कालावधीत वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन पाणीपुरवठा करण्याबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येतील असे लेखी आश्वासन सिडको करून देण्यात आले. संबंधित आश्वासनाचे पत्र आंदोलनकर्त्यांनी सुपूर्त करण्यात आले दरम्यान पाणी टंचाई बाबत स्पष्टीकरण देताना सिडको अधिकारी यांनी सांगितले की यंदा जुलै महिन्यापासून पावसाला सुरुवात झाली असली तरी त्यापूर्वी धरणातील पाणीसाठा अवघ्या दहा टक्क्यावर आला होता त्यामुळे उपलब्ध पाण्याचे नियोजन करून पुरवठा करावा लागला. आता धरणातील पाणीसाठा हळूहळू वाढत असून पुढील काही दिवसात परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा आहे तसेच नागरिकांच्या मागण्यावर सकारात्मक विचार करून आवत्या आवश्यक उपाययोजना करण्यात येतील असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सिडकोच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी दिलेल्या मुदतीस तोच निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा नगरसेवक समीर कदम व उषा अडसोडे तसेच आंदोलन कर्त्यांनी दिला आहे.

# भीमा नदीच्या महापुरानंतर पुळूज बंधारा संकटात झाडांचा ढिगारा अडकल्याने गावाला पूरधोक्याची घंटा!



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** उजनी, वीरसह भीमा खोऱ्यातील सर्व धरणे शंभर टक्के भरल्यानंतर भीमा नदीत सुमारे दीड लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या अभूतपूर्व पुरामुळे पुळूज येथील भीमा नदीवरील बंधारा पूर्णपणे पाण्याखाली गेला होता. तब्बल ८ ते १० फूट उंचीने वेगाने वाहणाऱ्या पुराच्या पाण्याने नदीकाठची मोठमोठी झाडे, काटेरी झुडपे आणि महाकाय वृक्ष मुळासकट उपटून आणले. पुराचे पाणी ओसरल्यानंतर हे वृक्ष बंधाऱ्याच्या खांबांमध्ये व कठड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अडकून पडले आहेत. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांच्या मते, उजनी धरणातून पुन्हा पाण्याचा विसर्ग वाढल्यास या झाडांमुळे पाण्याचा प्रवाह अडून बंधाऱ्याजवळ फुगवटा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुराचे पाणी थेट पुळूज गावात आणि शेतशिवारात शिरून मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

याबाबत वारंवार मागणी करूनही पाटबंधारे विभाग व स्थानिक प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बंधाऱ्यात अडकलेली झाडे तातडीने हटवून नदीपात्र मोकळे करावे, अशी मागणी जोर धरत आहे. याशिवाय बंधाऱ्यावरील काँक्रीट स्लॅब, संरक्षण कठडे अनेक वर्षांपूर्वी पुरात वाहून गेल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून ये–जा करावी लागत असल्याचे सांगितले जात आहे. शासन निधी मंजूर करत असताना प्रत्यक्षात कामे झाली नसून कागदोपत्री कामे दाखवून निधीचा अपव्यय झाल्याचा आरोपही स्थानिकांनी केला आहे. बंधाऱ्याजवळ अधिकाऱ्यांच्या निवासासाठी व कार्यालयासाठी सुविधा असूनही अधिकारी मुक्कामी राहत नसल्याने देखरेख होत नाही. बंधाऱ्याची दारे चोरीला गेल्याच्या घटनांचीही प्रभावी चौकशी झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.उजनी धरणातून पुन्हा पाण्याचा विसर्ग वाढण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून पुळूज गावाला संभाव्य पूरधोक्यातून वाचवावे, अशी कळकळीची मागणी पुळूज परिसरातील शेतकरी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सोयगाव पंचायत समिती व तहसील कार्यालयात नागरिकांच्या तक्रार निवारण, आढावा बैठकीचे आयोजन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०३, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** आमदार अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून व अध्यक्षतेखाली सोयगाव येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयात लोकसंपर्क अभियानांतर्गत नागरिकांच्या तक्रार निवारण व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची सुनावणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.

तहसील कार्यालयातील बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी फेरफार, वारस नोंद, नामांतरण, ७/१२ दुरुस्ती, ई–पीक पाहणी, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती पंचनामे, महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण, गौण खनिजांची अवैध वाहतूक, जात, उत्पन्न व रहिवासी दाखल्यांसह सर्व महसूल विषयक प्रकरणांचा कालबद्ध निपटारा करण्याचे आदेश दिले.

आजच्या बैठकीत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर वेळेत कार्यवाही करून अर्जदाराला त्याची माहिती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच पाणंद रस्त्यांबाबतचे तिढे तातडीने सोडवून कामे सुरू करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

पंचायत समिती कार्यालयातील बैठकीत घरकुल, विहीर, रोजगार हमी योजनेसह विविध योजनांमध्ये लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी गंभीर असल्याचे सांगत अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत लाभापासून वंचित ठेवू नये, नागरिकांच्या अर्जांचा निश्चित कालमर्यादेत निपटारा करावा, ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांना गती द्यावी तसेच पिण्याचे पाणी, रस्ते, स्वच्छता, घरकुल, शौचालय व रोजगार हमी यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**प्रलंबित देयकांबाबत रोहयो मंत्री भारत गोगावले यांची भेट घेणार**

बैठकीदरम्यान वैयक्तिक सिंचन विहीर, गाय गोठा तसेच शासनाच्या विविध योजनांतील कुशल व अकुशल कामांची प्रलंबित देयके याबाबत अनेक नागरिकांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रारी मांडल्या. याची गंभीर दखल घेत , संबंधित मंत्री ना. भरत गोगावले यांची भेट घेवून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करू अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.



यावेळी आमदार अब्दुल सत्तार म्हणाले, जनतेची कामे हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना न्याय, सन्मान आणि वेळेत सेवा मिळाली पाहिजे. कामात दिरंगाई, हलगर्जीपणा किंवा भ्रष्टाचार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने काम करून जनतेचा विश्वास जपावा.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रत्येक तक्रारदाराशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत अनेक नागरिकांनी रेशनचा नियमित लाभ मिळत नसल्याची तक्रार मांडली. याची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना रेशनचा लाभ मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

# शालेय परिसरातून तळलेले पदार्थ होणार गायब ! पालकांमधून समाधान व्यक्त

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०३, शिरपूर (धुळे) :** अन्न व औषध प्रशासन विभागा (एफडीए) चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शालेय परिसरातून तळलेले विक्री होणारे पदार्थ वडापाव, कांदा भजे, बटाटा भजे, समोसा, चोकलेट्स, जंक फूड विकण्यास पुर्णपणे बंदी घातलेली असल्यामुळे शिरपूर पोलीस ठाणे हद्दीतील शालेय परिसरातून तळलेले पदार्थ गायब होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

बहुतांश शाळा कॉलेज अशा परिसरात तळलेले पदार्थ वडापाव, भजे,समोसा, जंक फूड, चॉकलेट्स, आईस्क्रीम, एनर्जी ड्रिंक स्टींग अशी आदी प्रकारची पदार्थ विक्री होत होती परंतु आता एफडीचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ५० मिटरच्या आतमध्ये वरील वस्तू विक्रीवर प्रतिबंध घातला असल्याने या निर्णयाचे पालकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.





शिरपूर सह परिसरातील शाळा कॉलेज अशा परिसरातून तळलेले पदार्थ हे विकण्यास बंदी असल्यामुळे वडापाव, समोसा, भजे, चोकलेट्स, एनर्जी ड्रिंक स्टींग, जंक फूड विक्री हि कालबाह्य होणार असल्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या शरीराला बाधा निर्माण होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता शालेय परिसरातून तळलेले पदार्थ विक्रीलाच लगाम घातलेला असल्यामुळे एफडीए चे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयाचे पालकांनी कौतुक केले आहे.

**यांचे धाबे दणाणले !**

एफडीचे आयुक्त तुकाराम मुंढे यांचा निर्णय होताच अगदी शाळेला चिटकून वडापाव,भजे, समोसा असे तळलेले पदार्थ व चोकलेट्स जंक फूड विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शालेय परिसरातून तळलेले पदार्थ व एनर्जी ड्रिंक चॉकलेट्स जंक फूड विक्री करणाऱ्यांवर कठोर अन् कडक कारवाई करण्यात येणार असून हि कारवाई अन्न औषध प्रशासन अधिकारी व पोलीस प्रशासन हे संयुक्त करणार आहेत.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अग्रणी नेते, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत, थोर समाजप्रबोधनकार आणि स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच हा क्रांतिकारी मंत्र देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर, साहित्यरत्न, समाजप्रबोधनकार आणि वंचित–शोषित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरतर्फे महानगर कार्यालयात अभिवादन व माल्यार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरतर्फे लोकमान्य टिळक विद्यालय, सिव्हिल लाईन येथे लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कृतज्ञ मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक समतेसाठी आणि जनजागृतीसाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणत राष्ट्रीय विचार, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा संदेश या महापुरुषांनी दिला असून त्यांच्या विचारांचे आजही



महत्त्व कायम असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा महामंत्री सविता दंढारे, महिला मोर्चा जिल्हा महानगर प्रभारी वंदना हातगावकर, नगरसेविका आशा देशमुख, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष विमल काटकर, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष कौसर खान, कामगार झोपडपट्टी अध्यक्ष रामकुमार आकापेल्लीवार, कार्तिक बोरेवार, शालू कन्नोजवार, दुर्गा वैरागडे, अनिता झाडे, रेश्मा पांडे, अंजु तोरे, भावना बरसागडे, शालिनी राऊत, वर्षा बोकडे, लता ब्राम्हणे, नफिसा पठाण, सपना सातपुते, वंदना हजारे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रध्वजाचे शिल्पकार पिंगली व्यंकय्या यांना ‘भारतरत्न’ द्या : डॉ.अजय दासरी यांची आग्रही मागणी

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०३, सोलापूर :** भारतीय राष्ट्रध्वजाचे शिल्पकार, थोर स्वातंत्र्यसैनिक आणि कृषी संशोधक पिंगली व्यंकय्या यांच्या कार्याचा गौरव देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने व्हावा, यासाठी त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्यात यावा, अशी आग्रही मागणी पद्मशाली स्टुडंट्स असोसिएशन तसेच महाराष्ट्र तेलुगू महासंघाचे संस्थापक डॉ. प्रा. अजय दासरी यांनी महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे केली आहे. पिंगली व्यंकय्या यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. दासरी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सांगितले की, भारतीय राष्ट्रध्वजाची संकल्पना साकारून पिंगली व्यंकय्या यांनी देशाला राष्ट्रीय अस्मिता, स्वाभिमान आणि एकात्मतेचे अमूल्य प्रतीक दिले. प्रत्येक भारतीयासाठी तिरंगा हा अभिमान, बलिदान आणि राष्ट्रएकतेचे सर्वोच्च प्रतीक असून, अशा महान राष्ट्रपुरुषाचा गौरव भारतरत्न पुरस्काराने होणे ही राष्ट्राची नैतिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. दासरी यांनी सांगितले की, भारत सरकारने २००९ मध्ये पिंगली व्यंकय्या यांच्या सन्मानार्थ विशेष स्मारक टपाल तिकीट प्रसिद्ध केले होते. तसेच २०११ मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याचा प्रस्तावही विचाराधीन होता. मात्र अद्याप त्याबाबत निर्णय झालेला नसल्याने येत्या २६ जानेवारी २०२७ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. देशभरातील पद्मशाली समाजासह सर्व राष्ट्रप्रेमी भारतीयांच्या भावना लक्षात घेऊन केंद्र शासनाने हा ऐतिहासिक निर्णय घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अशोक इंदापूरे व ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी मनोगत व्यक्त करत पिंगली व्यंकय्या यांच्या राष्ट्रकार्यातील योगदानाचा गौरव केला आणि त्यांना भारतरत्न देण्याच्या मागणीला जाहीर पाठिंबा दर्शविला.

कार्यक्रमास डॉ. प्रा. अजय दासरी, अशोक इंदापूरे, ॲड. श्रीनिवास क्यातम, यशवंत इंदापूरे, राजू येमुल, गोवर्धन कमटम, प्रा. व्यंकटेश रच्चा, प्रा. व्यंकटेश पडाल यांच्यासह पद्मशाली समाजबांधव व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. व्यंकटेश पडाल यांनी उपस्थितांचे आभार मानले.भारतरत्न मिळेपर्यंत देशभर जनजागृतीचा लढा सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# वासुंदेत रस्ता आणि रोहित्राच्या कामाचा शुभारंभ

## सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामीण विकासाला नवी दिशा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३,पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे शिवसेना नेते तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या पुढाकारामुळे वासुंदे गावात दोन महत्त्वाची विकासकामे मार्गी लागली आहेत. वासुंदे येथे बहुप्रतिक्षित दुधवडे वस्ती ते कुरण वस्ती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आणि शिर्के मळा परिसरातील नवीन रोहित्राच्या कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या दोन्ही कामांमुळे शेकडो ग्रामस्थांच्या दैनंदिन अडचणी दूर होणार आहेत. दुधवडे आणि कुरण वस्तीला जोडणारा रस्ता अनेक वर्षांपासून खड्ड्यात होता. पावसाळ्यात हा मार्ग जवळपास बंदच व्हायचा. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि आदिवासी बांधवांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. झावरे पाटील यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा रस्ता मंजूर करून घेतला. त्यांच्या शुभहस्ते भूमिपूजन झाले. रस्ता पूर्ण झाल्यानंतर वाहतूक जलद आणि सुरक्षित होईल. आदिवासी वस्तींना मुख्य प्रवाहाशी जोड मिळाल्याने शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

**नवीन रोहित्रामुळे वीजप्रश्न सुटणार**

शिर्के मळा परिसरातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून कमी दाब आणि वारंवार होणाऱ्या लोडशेडिंगमुळे त्रस्त होते. शेतीच्या मोटारी आणि घरगुती वापरासाठी हा मोठा अडथळा होता. ही समस्या लक्षात घेऊन झावरे पाटील यांनी विद्युत विभागाकडे पाठपुरावा केला आणि नवीन रोहित्र मंजूर करून आणले. मंजुरी मिळताच कामालाही तातडीने सुरुवात झाली आहे. रोहित्र सुरू झाल्यावर परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होणार असून शेतकऱ्यांना आणि गृहिणींना मोठा दिलासा मिळणार आहे.

---

**ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण**

या दोन्ही कामांच्या शुभारंभ प्रसंगी वासुंदे गावचे सरपंच, उपसरपंच, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व आदिवासी बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, गावागावात दर्जेदार रस्ते आणि अखंडित वीजपुरवठा देणे हेच माझे ध्येय आहे. नागरिकांच्या मागण्या प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. उपस्थित मान्यवरांनी या विकासकामांमुळे वासुंदेच्या प्रगतीला नवी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

# चांदोरी येथे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार

## ‘रयत शिक्षण संस्था ही माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ’ - नवनियुक्त मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राजेंद्र चांदे यांचे प्रतिपादन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** रयत शिक्षण संस्था ही माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून रयत परिवारातील सर्व सेवक, विद्यार्थी, हितचिंतक आणि आप्तेष्टांचा आहे, असे भावनिक व सडेतोड प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे नवनियुक्त मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राजेंद्र खंडेराव चांदे यांनी केले.रयत सत्कार समिती, नाशिक जिल्हा यांच्या वतीने नुकताच रोजी न्यू इंग्लिश स्कूल, चांदोरीसमोरील मीरा लॉन्स येथे रयत शिक्षण संस्थेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमनॲड. भगीरथजी (काका) शिंदेउपस्थित होते, तर अध्यक्षस्थान माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्यडी. एस. वडजेबापूयांनी भूषवले.

**दिमाखदार स्वागत आणि पुष्पवृष्टी**

या सोहळ्याचे संपूर्ण नियोजन व संकल्पना जनरल बॉडी सदस्यडॉ. सुजितजी गुंजाळयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली होती. झांजपथक व लेझीम पथकाच्या तालावर दिमाखदार मिरवणुकीने सर्व मान्यवरांचे सभास्थळी आगमन झाले. नाशिक जिल्ह्यातील २१ शाळांमधील शिक्षक व सेवकांनी पुष्पपाकळ्यांचा वर्षाव करत मान्यवरांचे उत्साहात स्वागत केले.

**विशेष सत्कार आणि गौरव**

राजेंद्र चांदे यांचा विशेष गौरव :- कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय (विंचूर) येथील ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चांदे यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथजी शिंदे यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

ॲड.भगीरथ शिंदे यांचा सत्कार :- संस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी

फेरनिवड झाल्याबद्दल ॲड. भगीरथजी शिंदे यांचाही भावुक गौरव करण्यात आला.

समन्वय समिती सदस्यांचा सन्मान :- सन २०२६ च्या समन्वय समितीतील कृष्णा धर्मा भामरे, माणिकशेठ मधुकर गायखे, विठ्ठलराजे भोसले, प्राचार्य नंदकुमार देवढे, जयवंत ठाकरे, सुनील पवार आणि प्रकल्प अधिकारी राजेंद्र काकुळते यांचाही शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**सामान्य शिक्षकही सर्वोच्च पदावर पोहोचू शकतो : ॲड. भगीरथ शिंदे**

आपल्या मनोगतात ॲड. भगीरथजी शिंदे म्हणाले, प्रामाणिकपणा, सचोटी, संयम आणि इतरांसाठी काम करण्याची निष्ठा असेल, तर एक सामान्य शिक्षकही रयत शिक्षण संस्थेच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो. राजेंद्र चांदे हे त्याचे जिवंत उदाहरण आहेत. अध्यक्षीय भाषणात डी. एस. वडजेबापू यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत चांदोरी येथील शिक्षकांच्या पाठीवरील कौतुकाची थाप अधिक मजबूत केली.

**उत्साही उपस्थिती व नियोजन**

या सोहळ्यास जनरल बॉडी सदस्य मनोज कवडे, शिवाजी सोनार, मोहनशेठ काकड, लाईफ वर्कर कैलास बागले, लाईफ मेंबर अर्जुन शेळके यांच्यासह विंचूर, चांदोरी, ठाणगाव, आडगाव, दापूर, वावी, पांगरी, सोमठाणे, निगडोळ, आसखेडा, चौगाव, पिंगळवाडे, केरसाने, मानोरी, जानोरी, खरशेत, साकोरा, वनसगाव, रुई, विंचूर प्राथमिक व टाकळी विंचूर येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुजित गुंजाळ यांनी केले. सूत्रसंचालन घनश्याम मोरे व जितेंद्र ठोके यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने केले, तर आभार ज्येष्ठ शिक्षक अंबादास चौधरी यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी रयत सत्कार समितीतील तरुण शिक्षकांसह न्यू इंग्लिश स्कूल (चांदोरी) चे विष्णू कोरडे, संजय शेटे, पंकज सरोदे, रावसाहेब म्हस्के, आकाश टर्ले, दीपक पगार, निलेश गावित, विष्णू गावित, संदीप शेवाळे, बापू दिवे, नितीन शिंदे, राजेंद्र टिळेकर, वैशाली टर्ले, वृषाली बेल्हेकर, अर्चना पवार, स्वप्नाली बोलावत्री, योगिता गोरडे, गणेश गायकवाड, रियाज मनियार व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिंतूर तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ

## महिंद्रा मॅक्स गाडी चोरीला; आयशर, ट्रक, चारचाकी, दुचाकीही सुरक्षित नाहीत; पोलीस प्रशासन झोपेत?




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०३, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यात वाहन चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून, चोरट्यांनी अक्षरशः नागरिकांची झोप उडवली आहे. आयशर, ट्रक, चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या चोरीच्या अनेक घटना घडूनही चोरट्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पोलीस प्रशासनाकडून गस्त, तपास आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केले जात असून, चोरटे मोकाट आणि नागरिक असुरक्षित अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा सुरू आहे.याच पार्श्वभूमीवर जिंतूर शहरातील आणखी एक वाहनचोरीची घटना समोर आली आहे. जिंतूर शहरातील पेट्रोल पंपाच्या आवारात उभी करण्यात आलेली महिंद्रा Maxx 2WD (MH-15-AS-9280) ही चारचाकी अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत लंपास केली. या संदर्भात जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरी गेलेल्या वाहनाची अंदाजे किंमत एक लाख रुपये असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, ही एखादी एकटी घटना नसून गेल्या काही महिन्यांत तालुक्यात आयशर, ट्रक, चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या चोरीच्या अनेक घटना घडल्या आहेत. मात्र, या घटनांमधील आरोपींना जेरबंद करण्यात पोलीस यंत्रणेला अपेक्षित यश मिळाले नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे वाहनमालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.रात्री उभी केलेली वाहने सकाळी जागेवर दिसतील की नाही, याची शाश्वती उरलेली नाही. अनेक जण आपल्या वाहनांसाठी खासगी सुरक्षा व्यवस्था करत आहेत, तर काही जण सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकडे वळले आहेत. तरीही संघटित वाहनचोरीच्या टोळ्या सक्रिय असल्याची शक्यता नाकारता येत नाही.कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत.

हरातील सर्व प्रमुख चौक, पेट्रोल पंप व पार्किंग ठिकाणी उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. रात्रीची पोलीस गस्त वाढवून संशयित वाहनांची नियमित तपासणी करावी. तालुक्यातील प्रवेश व निर्गमन मार्गांवर विशेष तपासणी नाके सुरू करावेत. वाहनचोरी प्रकरणांचा जलद तपास करून आरोपींना तातडीने अटक करावी. नागरिक आणि पोलीस यांच्या समन्वयातून वाहन सुरक्षा जनजागृती मोहीम राबवावी.


**नागरिकांचा सवाल...**

वाहनचोरीच्या घटना सतत घडत असताना चोरट्यांवर प्रभावी कारवाई कधी होणार? नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलीस प्रशासन ठोस पावले कधी उचलणार? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

जिंतूर तालुक्यात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांना वेळीच आळा घातला नाही, तर भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर आणि कायमस्वरूपी उपाययोजना करून वाहनचोरांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

## थोडक्यात बातम्या

### राज्य पत्रकार संघाच्या विभागीय अध्यक्षपदी दत्ता गाडगे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्षपदी पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील पत्रकार दत्ता गाडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अहिल्यानगर या ५जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाची धुरा आता त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तसेच, अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी नवीन जिल्हाध्यक्ष निवड जाहीर होईपर्यंत त्यांच्याकडेच कायम राहील. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश संघटक संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव तसेच सलग तीन वेळा पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून काम करताना दत्ता गाडगे यांनी पत्रकार संघटना बळकट करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष, संवादयात्रेचे यशस्वी आयोजन, कोरोनाकाळातील धाडसी पत्रकारिता, पत्रकार कल्याणासाठी विविध उपक्रम आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष ओळख मिळाली आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वी त्यांना उत्कृष्ट अध्यक्ष आणि उत्कृष्ट संघटक या राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाजसेवक अण्णासाहेब हजारे, ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आ.दिलीपराव वळसे, मा.मंत्री बाळासाहेब थोरात, पद्मश्री पोपटराव पवार, खा.निलेश लंके, खा.डॉ.अमोल कोल्हे, खा.सुजय पाटील, आ.काशिनाथ दाते, आ.शरद सोनवणे, आ.सत्यजित तांबे, आ.सत्यशील शेरकर, अशोकराव सानप, गंगाराम बेलकर आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

#### व्हॉइस ऑफ मीडिया व जयहिंद लोक चळवळीचा प्रेरणादायी उपक्रम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** व्हॉइस ऑफ मीडिया व्हीओएम इंटरनॅशनल फोरम, नाशिक जिल्हा आणि जयहिंद लोक चळवळ, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी नाशिक येथे पत्रकारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक साहित्य वितरणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते व्हॉइस ऑफ मीडियाच्या सदस्य पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास व्हॉइस ऑफ मीडियाचे राज्य समन्वयक कुमार कडलग, राज्य संघटक गोरक्षनाथ मदने, विभागीय अध्यक्ष दिलीप साळुंके, नाशिक महानगर जिल्हाध्यक्ष कपिल भास्कर, ज्येष्ठ पत्रकार नरेंद्र पाटील, सुनील खैरनार, ज्ञानेश्वर गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय अध्यक्ष दिलीप साळुंके यांनी तर दाभाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमात नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आलेल्या सुमारे ५५ विद्यार्थी-विद्यार्थिनींना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, डॉ.सुधीर तांबे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थीदशेत असतानाच प्रत्येकाने आपल्या भविष्यासाठी स्पष्ट ध्येय निश्चित केले पाहिजे. मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने परिश्रम करा. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. मेहनत, दूरदृष्टी, सकारात्मक विचार आणि चांगले संस्कार यांच्या बळावरच यश मिळते. समाजाला आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज आहे. आपण चांगला माणूस बनत शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे. आज दिलेले हे शैक्षणिक साहित्य केवळ भेट नसून, तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा आणि नवी ऊर्जा ठरो, अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी, पालक आणि पत्रकारांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. पत्रकारांच्या कुटुंबीयांप्रती सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेला हा उपक्रम भविष्यातही सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

### एअर इंडिया इमारतीच्या नुतनीकरणात लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य द्यावे -मुख्यमंत्री



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, मुंबई :** राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या अधिक गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नुतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नुतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.